| | |
|---|---|
| | **नागरी संरक्षण,**<br>**महाराष्ट्र राज्य, मुंबई** |

# युद्धसदृश्य परिस्थितीत नागरिकांसाठी सर्वसाधारण सूचना

संभाव्य धोक्यांमुळे किंवा युद्धसदृश्य परिस्थितीमुळे तणाव वाढल्यामुळे नागरिकांनी सुरक्षित, सज्ज आणि जागरूक राहण्यासाठी खालील सूचना पाळाव्यात:

## १. माहिती घेणे आणि सतर्क राहणे:-

- अधिकृत सरकारी चॅनेल्स (टीव्ही, रेडिओ, खात्रीशीर सोशल मीडिया, स्थानिक प्रशासन) यांच्याकडूनच माहिती घ्या.
- अफवा किंवा अनधिकृत माहिती पसरवू नका की ज्याने अशांतता वाढू शकते.

## २. आपत्कालीन आवश्यक वस्तू तयार ठेवा:-

- टॉर्च, बॅटऱ्या, मेणबत्त्या
- प्राथमिक उपचार किट व आवश्यक औषधे
- पाणी (किमान ३ दिवस पुरेसे) व टिकाऊ अन्न
- मोबाईल चार्जर आणि पॉवर बँक
- वैध ओळखपत्रे व आवश्यक रोख रक्कम
- महत्त्वाच्या संपर्क क्रमांकांची यादी

## ३. मूलभूत सुरक्षा नियम समजून घ्या:-

- जवळचे आश्रयस्थान, बंकर किंवा Evacuation Places.
- घरातील सुरक्षित जागा ओळखा ( खिडक्यांशिवाय असलेली खोली ).
- “लाइट्स आउट” किंवा “ब्लॅकआउट” सूचनांचे पालन करा.

४. हवाई हल्ला किंवा क्षेपणास्त्र अलर्ट आल्यास:-

- ताबडतोब घरात रहा; सुरक्षित, ठिकाणी आश्रय घ्या.
- खाली बसून डोकं झाका, खिडक्यांपासून दूर रहा.
- दिवे बंद करा व खिडक्यांवर जाड पडदे ठेवा.
- सायरन काळात लिफ्टचा वापर टाळा व जिन्यांचा वापर करा.

५. कुटुंब व समाजासाठी:-

- दिव्यांग व लहान मुले व वृद्ध व्यक्ती, आजारी व्यक्ती आणि आपल्या पाळीव प्राण्यांची काळजी घ्या.
- नागरी संरक्षण स्वयंसेवक, स्थानिक पोलीस किंवा सुरक्षा कर्मचा-यांनी दिलेल्या सूचना पाळा.

६. वाहतूक आणि प्रवास:-

- अनावश्यक प्रवास टाळा.
- वाहतूक नियमांचे पालन करा.
- सार्वजनिक वाहतुकीवर निर्बंध लागू असू शकतात; मार्गाबाबत माहिती घ्या.

७. सायबर सूचना:-

- संवेदनशील माहिती (सैन्य हालचाली, महत्त्वाचे ठिकाणे) शेअर करू नका.
- संशयास्पद लिंक किंवा मेसेजवर क्लिक करू नका किंवा पुढे पाठवू नका.
- आपत्कालीन परिस्थितीत नेटवर्क फ्रि ठेवण्यासाठी संवाद मर्यादित ठेवा.

८. शांत आणि सहकार्या करा:-

- घाबरल्याने गोंधळ निर्माण होतो—शांत राहा व इतरांनाही माहिती द्या व मदत करा.
- कर्फ्यू, हालचाल निर्बंध व आपत्कालीन आदेश पाळा.
- स्थानिक प्रशासनाला मदत करा.

९. आपत्कालीन संपर्क:-

- आपत्ती व्यवस्थापन विभाग मदत कक्ष - १०७० / १९१६ / ९३२१५८७१४३
- मुंबई पोलिस - १०० / ११२
- मुंबई अग्निशमन केंद्र - १०१, २३०८५९९२
- रूग्णवाहीका - १०८
- महिला मदत कक्ष - १०३
- अल्पवयीन मुलांकरिता मदत कक्ष - १०९८
- वन विभाग - १९२६
- गॅस गळती मदत कक्ष (LPG) - १९०६
- BEST पॉवर (शहर) - ८८२८८३०२८८, ९९३०९०११९३
- अदाणी एनर्जी (पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरांचा काही भाग) - ५०५४९१११, ५०५४७२२५
- महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिसिटी बोर्ड (पूर्व उपनगरे) - १८००-२३३-२३४५, ९९३०२६९३९८
- टाटा पॉवर (चेंबूर)- ६७१७५३६९
- रेल्वे संरक्षण दल (RPF): १८२ (ट्रेन-संबंधित आपत्कालीन परिस्थितींसाठी)

१०. **लक्षात ठेवा:-** आपली जागरूकता, शिस्त व एकात्मता राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यावश्यक आहे.

## नागरी संरक्षण कार्यालय, मुंबई यांचे कडून जनहितार्थ प्रसारित